23 APR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पूरनियंत्रणात शिवाजी विद्यापीठाने समन्वयक व्हावे

## स्वतंत्र केंद्रासाठी कृष्णा महापूर नियंत्रण समिती शासनाला प्रस्ताव देणार : पंचगंगा नदीच्या पुराबाबत विद्यापीठाकडून सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** कृष्णा खोऱ्यात येणाऱ्या पूरनियंत्रणात विविध विभागांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने राज्य शासनाने शिवाजी विद्यापीठात पूर नियंत्रण केंद्राची उभारणी करावी. विद्यापीठाने समन्वयक म्हणून काम करावे, अशी मागणी कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीने शुक्रवारी केली. त्याबाबत शासनाला प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय या समितीने यावेळी घेतला. पंचगंगा नदीला येणाऱ्या पुराची कारणे आणि त्यावरील उपायांचे विद्यापीठाच्या हवामान बदल अभ्यासकेंद्राने या समिती सदस्यांसमोर सादरीकरण केले.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीच्या सदस्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना कृष्णा नदी महापूर कारणे-उपाययोजनांबाबतची टिपणी दिली.

विद्यापीठातील भूगोल अधिविभागात आढावा बैठक झाली. त्यात हवामान बदल अभ्यासकेंद्राच्या कार्यवाहीची माहिती समिती सदस्यांनी जाणून घेतली. त्यानंतर पुढील कार्यवाहीबाबत चर्चा केली. पाऊस आणि धरणांतील विसर्ग बदल मोजण्याची यंत्रणा, डाप्लर रडार सिस्टम ही पूर नियंत्रण केंद्रात असावी. त्याद्वारे अभ्यास करून पुराबाबत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील नागरिकांना केंद्राने सजग करणे, पुराबाबत जनजागृती करण्याचे काम या केंद्राकडून होण्याबाबत शासनाला सुचविण्यात येणार असल्याचे या समितीचे सदस्य विजयकुमार दिवाण आणि हणमंतराव पवार यांनी सांगितले.

त्यावर शासनाने मान्यता, आर्थिक मदत आणि तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास समितीच्या मागणीनुसार केंद्राचे, समन्वयाचे काम करण्यास विद्यापीठ तयार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. यावेळी अधिसभा सदस्य संजय परमणे, कृती समितीचे सदस्य प्रदीप वायचळ, सर्जेराव पाटील, नीलेश पवार, प्रभाकर कैंगार, श्रीशैल मठपती, सुकुमार पाटील, आदी उपस्थित होते.

### पंचगंगा नदीला पूर येण्याची कारणे, उपाय

या बैठकीत हवामान बदल केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी पंचगंगा नदीला पूर येण्याची कारणे आणि उपायांचे सादरीकरण केले.

**कारणे अशी-**

- धरणातील पाणलोट क्षेत्र १२ टक्के, तर मुक्तपाणलोट क्षेत्र ८२ टक्के असून, त्याचा परिणाम पूर येण्यावर होतो.
- कमी कालावधीत अत्यंत जादा पाऊस पडण्याचा सुरु झालेला नवा पॅटर्न.
- बॅकवॉटर इफेक्टमुळे पंचगंगा नदीचे पाणी कृष्णा नदी सामावून घेत नाही. त्यामुळे पंचगंगा नदीचा पूर ओसरत नाही.
- नदी परिसरातील बफर झोनमध्ये वाढणारी बांधकामे

**उपाय असे-**

- बहिरेवाडी (शिरोळ) येथे पंचगंगानदीचे डायव्हर्जन चॅनेल (प्रवाहात बदल) करणे
- पंचगंगा नदीत छोटे कॅसकेड डॅम तयार करणे
- धरणांचे एकात्मिक परिचलन योग्य पद्धतीने करणे
- नवीन पूरनियंत्रण रेषा तयार करून त्यानुसार विकास आराखडा करावा



### ...म्हणून विद्यापीठ योग्य

पंचगंगा, कृष्णा नदीच्या काठावर शिवाजी विद्यापीठ संलग्नित सुमारे शंभर महाविद्यालये आहेत. त्यांच्या माध्यमातून पुराबाबतची माहिती संकलित करणे, नागरिकांची जनजागृती करता येणे शक्य आहे. त्यामुळे विद्यापीठ हे पूरनियंत्रणात समन्वयक म्हणून काम करण्यास योग्य असल्याचे संजय परमणे यांनी सांगितले. विद्यापीठाने महापुराबाबत पुढील अभ्यास करण्यासाठी समितीने कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीने तयार केलेली कारणे-उपाययोजनांची टिपणी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केल्याचे त्यांनी सांगितले.

23 APR 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा मुंबईतील 'आयसीटी'शी करार

## दोन्ही संस्थांमध्ये संशोधनासाठी सामंजस्य : प्रगत तंत्रे, कौशल्याचा होणार विद्यार्थ्यांना लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी)समवेत पाच वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी आता आयसीटीची कवाडे खुली केली आहेत.

या सामंजस्य करारावर दि. १२ एप्रिल रोजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि आयसीटीच्या रिसर्च अँड इनोव्हेशन विभागाच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. पद्मा व्ही. देवराजन यांनी स्वाक्षरी केली. यावेळी विद्यापीठातील प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. के. वाय. राजपुरे, आयसीटीचे प्रा. आर. आर. देशमुख, प्रा. पी. आर. गागळे आदी उपस्थित होते.

सहयोगी कार्यक्रम आणि इतर शैक्षणिक देवाण-घेवाण यासंदर्भात शिवाजी विद्यापीठ आणि आयसीटी यांच्यात शैक्षणिक आणि वैज्ञानिक सहकार्यावर आधारित परस्पर फायदेशीर संबंध प्रस्थापित करण्याचा सामंजस्य करार करण्यात आला.

अनेक प्रगत तंत्रे आणि कौशल्ये आयसीटी मुंबई येथे उपलब्ध आहेत. ज्यामुळे शिवाजी विद्यापीठातील विविध विज्ञान विभागांचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मदत होईल.

तथापि, दोन संस्थांमध्ये हा सामंजस्य करार करण्यासाठी माझ्या प्रयत्नांमुळे दोन्ही बाजूचे विद्यार्थी आणि प्राध्यापक सदस्यांना फायदा होईल. मी आधीपासून आयसीटीच्या सहकार्याने काम करत आहे आणि यापुढे आणखी बरेच नवीन संशोधन होणे अपेक्षित असल्याचे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले.

### यासाठी करार ठरणार उपयुक्त...

आयसीटी आणि प्रा. सोनकवडे यांनी कोरोनाच्या पहिल्या लाटेदरम्यान सॅनिटायझेशन टनेल विकसित केले. आता या सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांनी विविध संशोधन उपक्रम सुरू केले आहेत. त्याचे प्रस्ताव निधी संस्थांकडे सादर केले जातील. संयुक्त संशोधन आणि प्रकाशनाला आणखी गती मिळेल. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना त्यांची कौशल्ये वाढविण्यासाठी आयसीटीच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या सहकार्याने काम करून त्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी हा करार नक्कीच उपयुक्त ठरेल.



भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र जैवतंत्रज्ञान नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग, अशा विविध प्रमुख विज्ञान विभागांमधील संयुक्त स्वारस्य असलेला हा सामंजस्य करार करण्यासाठी आयसीटीचे मनापासून आभार.

\- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान विभागात, सैफ सेंटरमध्ये आणि आयसीटीच्या विविध कॅम्पसमध्ये उपलब्ध असणारी अत्याधुनिक उपकरणे वापरण्यासाठीचे कौशल्य एकमेकांस नक्की उपयुक्त ठरतील. प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या गतिमान, सक्रिय पुढाकारामुळे सामंजस्य करार केला.

\- प्रा. अनिरुद्ध पंडित, कुलगुरू, आयसीटी

लोकमत

# प्रवीण कोडोलीकर यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कौतुक कोडोलीकर यांच्या 'राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्र सेवा दल' या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते आज, शनिवारी दुपारी ४.३० वाजता होणार आहे. येथील शासकीय विश्रामगृहात हा कार्यक्रम होईल. डॉ. कोडोलीकर यांनी मूळ पीएच. डी. संशोधनासाठी राष्ट्र सेवा दलाच्या समग्र वाटचालीचा वेध घेऊन त्या अनुषंगाने अत्यंत वस्तुनिष्ठ मांडणी केली. त्यांच्या या संशोधनाचे हे ग्रंथरुप आहे. ज्येष्ठ विचारवंत ग. प्र. प्रधान यांची लाभलेली प्रस्तावना हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

पुढारी

# विद्यापीठात आज विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शनिवारी (दि. २३) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार व कार्याची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव, परभणी, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, सातारा मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने सोमवारपासून पुनर्परीक्षांना सुरुवात

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सोमवार (दि. २५) पासून पुनर्परीक्षांना सुरुवात होणार आहे. विद्यापीठ संकेतस्थळावर याबाबतची माहिती देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आल्या. या परीक्षा देताना तांत्रिक अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपलब्ध लिंकद्वारे नोंदणी करण्याबाबत सूचित केले होते. त्याप्रमाणे पुनर्परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा दि. २५ एप्रिलपासून आयोजित केली आहे. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्परीक्षा देणे आवश्यक आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षेचा निकाल अंतिम राहील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

तरुण भारत

# विद्यापीठ पुनर्परीक्षेला सोमवारपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ऑनलाईन पुनर्परीक्षेला सोमवारी, २५ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण आली आहे. त्यांच्यासाठी पुनर्परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी लिंक दिली होती. मुदतीत अर्ज भरलेल्याना परीक्षा देता येणार आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ परीक्षा मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठांतर्गत ९०० विषयांच्या ऑनलाईन पुनर्परीक्षा होणार आहेत. साधारणपणे ९ हजार विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षेसंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेचा डेमो उपलब्ध आहे. ऑनलाईन पुनर्परीक्षा देण्याची विद्यार्थ्यांना शेवटची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संकेत स्थळावरील परीक्षेचे वेळापत्रक पहावे, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आयसीटी संस्थेशी करार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सोबत पाच वर्षांसाठी सामंजस्य करार केला आहे. या करारावर विद्यापीठाकडून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि आयसीटी मुंबईचे रिसर्च अँड इनोव्हेशन, अधिष्ठाता डॉ. पद्मा व्ही. देवराजन यांनी स्वाक्षरी केली आहे.

- **संशोधन, विद्यार्थी, प्राध्यापक देवाणघेवाण**

यासाठी विद्यापीठातील डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. के. वाय. राजपुरे तर आयसीटीचे प्रा. आर. आर. देशमुख, प्रा. पी. आर. गागळे यांनी प्रयत्न केले.

या करारामुळे सहयोगी कार्यक्रम, इतर शैक्षणिक देवाणघेवाण होणार आहे. विद्यापीठ आणि आयसीटी यांच्यात शैक्षणिक आणि वैज्ञानिक सहकार्यावर आधारित परस्पर संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे दोन्ही विद्यापीठांनी विविध संशोधन उपक्रम सुरू केले आहेत. दोन्ही संस्थांमधील या समान स्वारस्य असणाऱ्यांना या करारामुळे संयुक्त संशोधनाला गती मिळणार आहे. संयुक्त चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा आयोजित करून प्रशासन, व्यवस्थापनाशी संबंधित अनुभव, कौशल्याची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
2 3 APR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पूर नियंत्रण केंद्र स्थापन करावे

- **कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीची कुलगुरूंकडे मागणी**
- **शिवाजी विद्यापीठात भूगोल विभागात आढावा बैठक**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कृष्णा-पंचगंगा नदीतील पूर नियंत्रणासाठी स्वतंत्र केंद्र स्थापन करावे, अशी मागणी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीने केली. तसा प्रस्ताव शासनाला सादर करण्याचा निर्णय घेतला.

कृष्णा महापूर नियंत्रण कृती समितीच्या बैठकीत शुक्रवारी हा निर्णय घेण्यात आला. पूर नियंत्रण केंद्रात पाऊस, धरणांतील विसर्ग बदल मोजण्याची यंत्रणा असावी. यासह अन्य मागण्या केल्या जाणार आहेत. पंचगंगेला पूर येण्याची कारणे, उपाय, हवामान बदल याबाबत केंद्र समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी माहिती दिली. यावेळी समितीचे सदस्य विजयकुमार दिवाण, हणमंतराव पवार, संजय परमणे, प्रदीप वायचळ, सर्जेराव पाटील, निलेश पवार उपस्थित होते.